# // प्रेसनोट //

दि:२९/०७/२०२२

शासनामार्फत प्राप्त झालेल्या “इन्फ्ल्युएंझा प्रतिबंध व नियंत्रण मार्गदर्शक सुचना आणि अंमलात आणावयाच्या उपाययोजना” आदेशानुसार महापालिकेअंतर्गत कार्यरत आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे, त्याअनुषंगाने रुग्णाच्या सहवासितांचे सर्वेक्षण, औषधोपचार करण्यात येत आहे.

मनपा आरोग्य केंद्र, भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालय, पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय येथे संशयित रुग्णांची तपासणी सुरु करण्यात आली आहे. महापालिका कार्यक्षेत्रात सद्यस्थितीत ३ स्वाईन फ्ल्यु (ए एच १ एन १ ) चे रुग्ण खाजगी रुग्णालयात दाखल असून औषधोपचार सुरु आहे. महापालिकेच्या कोविड-१९ (RT-PCR) लॅब येथे लवकरच इन्फ्ल्युएंझा एच १ एन १ तपासणीची सोय सुरु करण्यात येणार आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात व पं. भीमसेजन जोशी सामान्य रुग्णालयात स्वाईन फ्ल्युवरील औषधसाठा उपलब्ध आहे.

पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय येथे स्वाईनफ्ल्यूच्या रुग्णांसाठी २० खाटांचा स्वतंत्र विलगीकरण कक्ष निर्माण करण्यात आला असून सदर ठिकाणी रुग्णांवर औषधोपचाराची सोय उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

१. इन्फ्ल्युएंझा ए एच १ एन १ टाळण्यासाठी हे करा—

- वारंवार साबण व स्वच्छ पाण्याने हात धुवा.
- पौष्टिक आहार घ्या.
- लिंबु, आवळा, मोसंबी, संत्री, हिरव्या पालेभाज्या या सारख्या आरोग्यदायी पदार्थांचा आहारात वापर करा.
- धुम्रपान टाळा.
- पुरेशी झोप आणि विश्रांती घ्या.
- भरपूर पाणी प्या, या गोष्ठी करा, तसेच

२. इन्फ्ल्युएंझा ए एच १ एन १ टाळण्यासाठी हे करु नका—

- हस्तांदोलन
- सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
- डॉक्टरांच्या सल्याशिवाय औषध घेऊ नका.
- आपल्याला फ्ल्यु सदृश्य लक्षणे असतील तर गर्दीच्या ठिकाणी जाऊ नका, नागरिकांनी आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे

**डॉ. नंदकिशोर लहाने**
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**